| MHOS010015642024 | | |
|---|---|---|
| | दाखल दिनांक | १३.०९.२०२२ |
| | नोंदणी दिनांक | १४.०९.२०२२ |
| | निकाल दिनांक | १०.०८.२०२६ |
| | कालावधी | ०३ व.१० म.२८ दि. |

**जिल्हा न्यायाधीश - १, उस्मानाबाद यांचे न्यायालयात**

**( पिठासीन अधिकारी डॉ.एम.ए.एफ. ख्वाजा)**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १५८/२०२४** **निशाणी क्र. ४५**

**(जुना भुसंपादन अर्ज क्र. ३९५/२०२२)**

१. **श्रीमती भामाबाई मनोहर क्षिरसागर.**
वय ६५ वर्षे, धंदा घरकाम.

२. **श्री. हणमंत मनोहर क्षिरसागर.**
वय ५० वर्षे, धंदा शेती.

३. **श्री. बंडु मनोहर क्षिरसागर.** **आक्षेप अर्जदार**
वय ५० वर्षे, धंदा शेती.
१ ते ३ राहणार सिंदफळ, ता. तुळजापूर, जि.उस्मानाबाद

४. **श्रीमती सुजाता संजय क्षिरसागर.**
वय ६५ वर्षे, धंदा - शेती,
ह.मु.जळकोट, ता.तुळजापूर, जि. उस्मानाबाद
रा. सिंदफळ, ता.तुळजापूर, जि. उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. **श्रीमती. प्रेमा साधु क्षिरसागर.**
वय ६२ वर्षे, धंदा शेती,
राहणार सिंदफळ, ता. तुळजापूर, जि.उस्मानाबाद. **सामनेवाला / गैरअर्जदार**

**अर्ज – राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ चे कलम ३एच(४) नुसार**

---

विधिज्ञ श्री.पी.एम.टेळे-आक्षेप अर्जदार क्र. १ ते ३ करीता
विधिज्ञ श्री.एस.आर.दुधभाते-आक्षेप अर्जदार क्र. ४ करीता
विधिज्ञ श्री.एस. आर. लोमटे - सामनेवाला/गैरअर्जदार क्र. १ करीता

---

**न्यायनिर्णय**
**( दिनांक १०.०८.२०२६ )**

**१.** सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन ) मध्यम प्रकल्प २, उस्मानाबाद यांनी प्रस्तूत भूसंपादन निर्देशन अर्ज कलम ३ एच (४) राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ अन्वये संपादीत जमीनीचा मालकी हक्क निश्चित करुन मावेजा वाटप करणे साठी या न्यायालयाकडे पाठविलेला आहे.

**तक्रारदार यांचा आक्षेप थोडक्यात खालील प्रमाणे–**

**२.** मौजे सिंदफळ, ता. तुळजापूर जि.उस्मानाबाद येथील अतिरिक्त निवाडा दिनांक २०.०४.२०२१ रोजीच्या निवाडयामध्ये जमीन गट क्रमांक ४२० मधुन राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ (नवीन क्र.५२) च्या चौपदरी करणासाठी भूसंपादन संचिका जा.क्र. २०१९/भूस/रा.म.मा./सीआर/०५/५२८ मध्ये पारीत करण्यांत आलेल्या तारीख ०७.०९.२०२२ च्या निवाडयानुसार संपादीत करण्यात आले आहे. मौजे सिंदफळ ता. तुळजापुर जि. उस्मानाबाद येथील जमीन गट नं. ४२०/१ क्षेत्र ०० हे ५८ आर ही जमीन भामाबाई मनोहर क्षिरसागर यांनी साधू भगवान क्षिरसागर यांचे हक्कात दि. ०१/०२/१९९० रोजी लिहुन दिलेले खरेदीखत हे खरेदीखत नसून ते गहानखत आहे असे जाहिर करून ते प्रतिवादींनी वादीच्या हक्कात गहान मुक्त करून परत विकत देण्यासंबंधीचा दावा तुळजापुर येथील दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर, यांचे कोर्टात वरील अर्जदार यांनी दाखल केलेला असून सदरचे प्रकरण हे आर.सि.एस.नं. ३४८/२०१५ भामाबाई मनोहर क्षिरसागर

व इतर विरुध्द प्रेमा साधू क्षिरसागर व इतर हे प्रकरण न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे. वरील अर्जदार यांनी में. दिवाणी न्यायाधिश साहेब वरिष्ठ स्तर, उस्मानाबाद यांचे न्यायालयात आर.सि.एस.नं. १६३/२०१६ भामाबाई मनोहर क्षिरसागर व इतर विरूध्द महाराष्ट्र शासन व इतर हे प्रकरण दाखल केलेले असून सदरचे प्रकरण हे न्यायप्रविष्ठ आहे. सदर प्रकरणात प्रतिवादी क्र. १ महाराष्ट्र शासन तर्फे, जिल्हाधिकारी साहेब, उस्मानाबाद, प्रतिवादी क्र. २ सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी भूसंपादन मध्यम प्रकल्प नं.२ उस्मानाबाद व प्रतिवादी क्र. ३ प्रोजक्ट डायरेक्टर नॅशनल हायवे अथॉरिटी ऑफ इंडिया, सोलापुर यांना प्रतिवादी म्हणुन नमुद असलेला दावा हा जमीन गट नं. ४२०/१ मधील संपादीत जमीनीचा मावेजा हा आर.सि.एस. ३४८/२०१५ भामाबाई मनोहर क्षिरसागर व इतर विरुध्द प्रेमा साधू क्षिरसागर व इतर या प्रकरणची संपूर्ण सुनावणी होईपर्यंत सदरचा मावेजा हा वाटप करण्यास मनाईवा दावा वरील अर्जदार यांनी दाखल केलेला असून सदरचा दावा हा दिवाणी न्यायाधिश साहेब, वरिष्ठ स्तर उस्मानाबाद यांचे न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे. मौजे सिंदफळ ता. तुळजापुर जि. उस्मानाबाद येथील जमीन गट क्र. ४२०/१ क्षेत्र ०० हे ५८ आर ही जमीन सदर अर्जदार यांची वडिलार्जीत मालकी व कब्जेवहिवाटीची होती व आहे. मयत साधू भगवान क्षिरसागर हे खाजगीरित्या व विनापरवाना सावकारीचा व्यवसाय करीत असत. ते भामाबाई मनोहर क्षिरसागर यांच्या जवळच्या भावकीतील होते. हणंमत मनोहर क्षिरसागर व बंडू मनोहर क्षिरसागर हे जानेवारी १९९० मध्ये फार आजारी असल्यामुळे रुपये ४,५००/–हे हातउसणे भामाबाई मनोहर क्षिरसागर यांनी साधू यांच्याकडे मागितले असता मयत साधू यांनी सदरची रक्कम हातउसणे न देता व्याजाने देण्याचे मान्य केले परंतू त्यांच्याकडे सावकारी करण्याचा परवाना नसल्याने ती रक्कम व दोन वर्षाचे व्याज रुपये ४,५००/– अशी एकुण रक्कम रुपये ९,०००/– ही आकारणी करून

३. सदर रक्कमेची सुरक्षितता व वसुलीची हमी म्हणुन तेवढ्या रक्कमेचे त्यांचे हक्कात दावा जमिनीचे नामधारी खरेदीखत करुन देण्याची अट घातली. शिवाय खरेदीखत देणेचा व परत खरेदीखत करुन घेण्याचा सर्व खर्च भामाबाई मनोहर क्षिरसागर यांनी करण्याचा अट पण घातली. अर्जदार भामाबाई मनोहर क्षिरसागर यांच्या मुलांच्या दवाखान्यासाठी इतर कारणांसाठी पैसाची नितांत गरज होती म्हणुन मयत साधू यांचे अटीप्रमाणे व्याजाने घेण्याचे मान्य केले. मुळात सदरचे खरेदीखत हे खरेदीखत नसून ते गहानखतच होते. त्यामुळे मौजे सिंदफळ ता. तुळजापुर जि. उस्मानाबाद येथील जमीन गट नं. ४२०/१ मधील क्षेत्र ०० हे ५८ आर, आकार १ रु ८० पैसे (दाव्याच्या कॉलम क्र. १ मध्ये नमुद केलेल्या चतुः सिमेच्या आतील) या दावा जमीनीचे वादी क्रं. १ ने मयत साधू भगवान क्षिरसागर यांचे हक्कात दि. ०१/०२/१९९० रोजी दस्त नं. १२१ अन्वये हे खरेदीखत नसून ते गहानखत आहे असे जाहिर करून ती जमीन करून दावा जमीनीचे खरेदीखत वादीचे हक्कात करुन देण्यासंबंधी दावा दाखल असून सदरचा दावा न्यायप्रविष्ठ आहे. आर. सि.एस. ३४८/२०१५ भामाबाई व इतर विरुध्द प्रेमाबाई व इतर या प्रकारणाच्या दाव्याची झेरॉक्स प्रत सदर तक्रारी अर्जासोबत जोडली आहे. आर.सी.एस. १६३/२०१६ भामाबाई व इतर विरुध्द शासन व इतर या प्रकारणाची दाव्याची सत्यप्रत या तक्रारी अर्जासोबत जोडली आहे. सदरील संपादीत जमीन ही वादाधित असून त्यामुळे त्याचा मावेजा सुध्दा वादाधित आहे. सदरचा मावेजा वाटप करु नये याबाबत आपण भूसंपादन अधिकारी यांना प्रतिवादी म्हणुन समाविष्ट करून अर्जदार यांनी मनाईचा दावा दाखल केलेला असून सदरचा दावा सुध्दा न्यायप्रविष्ठ आहे. त्यामुळे वरील नमुद केलेल्या सर्व न्यायप्रविष्ठ बाबीमुळे मौजे सिंदफळ ता. तुळजापुर जि. उस्मानाबाद जमीन गट नं. ४२०/१ मधील संपादीत क्षेत्र १०००.०० स्के. मीटर चा मावेजा रुपये ३१,५७,५००/– रुपये मावेजा हा प्रेमा साधू क्षिरसागर रा.

सिंदफळ ता. तुळजापुर जि. उस्मानाबाद यांना वाटप करण्यात येवू नये अशी विनंती आक्षेप अर्जदार यांनी केली आहे.

४. सदर प्रकरणामध्ये गैरअर्जदार प्रेमा साधू क्षिरसागर यांनी निशाणी क्रमांक २१ वरील पुरसिस नुसार सक्षम अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, भूसंपादन प्रकल्प क्र. २ उस्मानाबाद यांचेकडे दाखल केलेले म्हणणे कायम ठेवण्यात आले ते असे आहे की त्यांनी मौजे सिंदफळ येथील गट क्रमांक ४२०/१ क्षेत्र ०० हे. ५८ आर ही जमीन त्यांचे मयत पती साधु भगवान क्षिरसागर यांनी दिनांक ०१.०२.१९९० रोजी भामाबाई मनोहर क्षिरसागर यांचेकडुन नोंदणीकृत खरेदीखता आधारे विकत घेतली आहे. विकत घेतल्यानंतर त्यांच्या पतीच्या नावे महसुल दप्तरी फेरफार मंजुर झालेला आहे. त्यांचे पती दिनांक २३.०८.२००७ रोजी मयत झाले आहेत. त्यानंतर सदर जमीनीस वारसा हक्काने गैरअर्जदार व त्यांचा मुलगा संतोष साधू क्षिरसागर, मुलगी कवीता राजेंद्र सोनटक्के तसेच त्यांचा आणखी एक मयत मुलगा संजय साधू क्षिरसागर यांच्या पश्चात त्यांची पत्नी सुजाता संजय क्षिरसागर व मुले प्रथमेश संजय क्षिरसागर, श्रुती संजय क्षिरसागर व प्रिती संजय क्षिरसागर यांची नावे महसुली दप्तरी फेरफार मंजुर होऊन लागलेली आहेत. साल सन २०१५ पासुन शासनाने सोलापूर-धुळे या महामार्गाचे विस्तारीकरण करण्यासाठी अधिसूचना काढलेल्या होत्या. सदरची घटना तक्रारदार व तिच्या मुलांना माहित झाल्यानंतर गैरअर्जदार यांचे पतीने खरेदी घेतलेली जमीन संपादन कार्यवाही संपादित होणार आहे व त्याचा भरपूर मावेजा मिळणार आहे हे लक्षात आल्यानंतर सदरील रक्कम गैरअजदारास मिळू नये व गैरअर्जदाराची जमीन त्यांच्या पतीच्या पश्चात हडप करण्याच्या उद्देशाने वादी/तक्रारदार यांनी मा.दिवाणी न्यायालय तुळजापूर येथे गैरअर्जदारांच्या विरोधात नियमीत दिवाणी दावा क्रमांक ३४८/२०१५ हा दाखल केला व त्यानंतर संपादन होऊन गैरअर्जदारांना मावेजा

मंजुर झाल्यानंतर सदरील रक्कम गैरअर्जदारांना मिळू नये या उद्देशाने नंतर मा. जिल्हाधिकारी, धाराशिव यांना दाव्यात समाविष्ठ करुन मा.दिवाणी न्यायालय, धाराशिव येथे नियमीत दिवाणी दावा क्रमांक १६३/२०१६ हा दाखल केला असल्याने मा. भूसंपादन अधिकारी यांनी सदर मावेजाबाबत वाद निर्माण असल्याने सदरची मावेजा रक्कम या न्यायालयात वर्ग केलेली आहे व तक्रारदार यांनी दाखल केलेली वरील दोन्ही दावे पैरवीअभावी खारीज करण्यात आले आहेत (Dismissed in default).

तक्रारदारांचे म्हणणे की, गैरअर्जदार यांचे पतीमध्ये व तक्रारदार मधील व्यवहार हा तारण गहाणखताचा होता. परंतु आजतागायत तक्रारदार यांनी कोणत्याही कार्यालयामध्ये वरील नमुद व्यवहार हा गहाणखताचा होता व सावकारीकी बाबतची तक्रार दाखल केलेली नाही. तसेच या प्रकरणात देखील तसा कोणताही कागदोपत्री पुरावा या न्यायालयात दाखल केलेला नाही. म्हणुन त्या तक्रारीचा विचार करता येणार नाही. विशेषतः गैरअर्जदाराच्या हक्कात झालेले खरेदीखत हे आजतागायत कोणत्याही न्यायालयाने रद्दबातल केलेले नाही तसेच गैरअर्जदार यांच्या हक्कात मंजुर झालेल्या फेरफाराला कोणीही कोणत्याही न्यायालयात आव्हानित केलेले नाही व ते आजतागायत कायम आहे. म्हणुन तक्रार खर्चासह खारिज करण्यात यावी व गैरअर्जदारांच्या नावे भूसंपादन अधिकारी यांनी मंजुर केलेला या न्यायालयात जमा केलेला मावेजा रक्कम रुपये ३१,५७,५००/- (रुपये एकतीस लाख सत्तावन हजार पाचशे फक्त) ही व्याजासह गैरअर्जदार यांना देण्यात यावी.

**५.** विद्वान सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी भूसंपादन मध्यम प्रकल्प उस्मानाबाद यांनी तक्रारदार यांना न्यायनिवाडयाप्रमाणे प्रकरणातील

अर्जदार, गैरअर्जदार व इतर हितसंबंधीत यांचा संपादित क्षेत्राचा मालकी हक्क निश्चित करुन सर्व संबंधितांना त्यांच्या हिश्याचा मावेजा वाटप करण्यासंबंधी हा संदर्भ या न्यायालयाकडे पाठवलेला आहे.

६. अर्जदारातर्फे हणमंत मनोहर क्षिरसागर यांचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्रमांक ३५ कडे तर गैरअर्जदारातर्फे प्रेमा साधु क्षिरसागर यांचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्रमांक ३८ कडे दाखल आहे.

७. आक्षेप अर्जदार व गैरअर्जदार/सामनेवाला यांचे परस्पर विरोधी म्हणणे लक्षात घेता नि.क्र.२२ वर मुद्दे कायम केले आहेत. त्याखाली दिलेल्या कारणमिमांसे आधारे त्यावर निष्कर्ष नोंदविण्यात आले .

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आक्षेप अर्जदारांनी संपादित जमीनीची नुकसान भरपाई मिळण्यास ते पात्र असल्याचे सिध्द केले आहे काय ? | ...नकारार्थी |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्र.१ करीताः**

८. आक्षेप अर्जदार व गैरअर्जदार यांच्या वतीने युक्तीवाद ऐकला व दाखल कागदोपत्री व तोंडी पुराव्याचे अवलोकन केले. तसेच आक्षेप अर्जदार यांनी त्यांचा लेखी युक्तीवाद निशाणी क्रमांक ४३ वर दाखल केला व गैरअर्जदार यांनी त्यांचा लेखी युक्तीवाद निशाणी क्रमांक ४४ वर दाखल केला, त्याचेही अवलोकन केले.

९. तक्रारदार यांच्या म्हणण्यानुसार मौजे सिंदफळ येथील जमीन गट

क्रमांक ४०१/१ एकुण क्षेत्र ०१ हे १६ आर ही जमीन अर्जदाराची वडीलोपार्जित जमीन आहे. सदर मिळकतीपैकी ०० हे. ५८ आर क्षेत्र हे गैरअर्जदार यांच्या कुटुंबाकडे गहाणखत म्हणुन करुन दिलेले होते व उर्वरित क्षेत्र अर्जदाराच्या नावे होते. परंतु महाराष्ट्र शासनाने राष्ट्रीय महामार्ग क्र. ५२ करीता ०० हे. १४ आर क्षेत्र संपादित केले व त्यानुसार फेर क्रमांक ६५०६ हा ७/१२ पत्रकी नोंदवण्यात आला व आज रोजी जमीन गट क्रमांक ४२०/१ च्या ७/१२ पत्रकाचे अवलोकन करता गैरअर्जदार व गैरअर्जदाराचे सहहिस्सेदार यांच्या नावाने क्षेत्र ० हे ५८ आर जे की तथाकथीत गहाणखताच्या नावाने नोंदवण्यात आले होते तेवढे क्षेत्र आजही ७/१२ पत्रकी दिसुन येते. उर्वरित ५८ आर क्षेत्रापैकी अर्जदाराच्या नावे ४८ आर क्षेत्र व सडक परिवहन व राजमार्ग मंत्रालय भारत सरकार यांच्या नावाने १४ आर क्षेत्र दिसुन येते. यावरुन गैरअर्जदाराच्या नावाने संपादित क्षेत्राबाबत कोणतीही नोंद ७/१२ पत्रकी झाल्याचे दिसून येत नाही. उलटपक्षी अर्जदाराचे क्षेत्र कमी झाल्याचे ७/१२ पत्राकावरुन दिसुन येत आहे. त्यामुळे एकतर सदरचा मावेजा मुळ दावा क्रमांक ३४८/२०१५ व दावा क्रमांक १९५/२०१७ हे दोन दावे निकाली लागेपावेतो वाटप करणे योग्य होणार नाही.

१०. येथे असे नमूद करणे क्रमप्राप्त ठरेल की आजतागायत तक्रारदार यांनी गैरअर्जदार यांच्या पतीमधील व त्यांच्यातला व्यवहार कायमखुश खरेदीखत नसुन हा तारणगहाण खताचा होता अशा त-हेची तक्रार कोणत्याही कार्यालयामध्ये दिलेली नाही किंवा सावकारकी बाबतची तक्रार देखील दाखल केली नाही. तसेच या प्रकरणात त्यांच्या म्हणण्याच्या पुष्ठयर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. या प्रकरणातील अर्जदार यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये देखील सदरची बाब मान्य केलेली आहे. तसेच सावकारकी बाबत कोठेही तक्रार दिलेली नाही हे देखील मान्य केलेले आहे. दिवाणी दावा क्रमांक १६३/२०१६ व ३४८/२०१५ हे दोन्ही

दावे पैरवी अभावी खारीज करण्यात आलेले आहेत. त्यांना पुन्हा पटलावर घेण्याबाबतचे अर्ज आजतागायत मंजुर करण्यात आले नाहीत. अनिश्चित काळासाठी हे प्रकरण न्यायप्रविष्ठ ठेवता येणे कायदयाच्या दृष्टीने अभिप्रेत नाही व न्यायाचे देखील होणार नाही. या सर्व बाबींवरुन एकच निष्कर्ष काढण्यात येतो तो असा की गैरअर्जदाराच्या पतीच्या हक्कात झालेला व्यवहार हा कायमखुश खरेदीचा होता तो कसल्याही प्रकारचा सावकारकीचा नव्हता, तरी देखील गैरअर्जदार यांना मंजुर झालेला मावेजा येणकेण प्रकारे त्यांना मिळू नये म्हणुन दिवाणी दावे दाखल करण्यात आले. आक्षेपामध्ये कोणतेही तथ्य किंवा गुणवत्ता दिसुन येत नाही. आजतागायत गैरअर्जदाराच्या पतीच्या हक्कात झालेले खरेदीखत कोणत्याही सक्षम न्यायालयाने रद्दबातल केलेले नाही. तसेच गैरअर्जदाराच्या हक्कामध्ये मंजुर झालेल्या फेरफाराबाबत कोणीही कोणत्याही न्यायालयात आव्हान केलेले नाही व ते आजतागायत कायम आहेत.

**११.** अर्जदारातर्फे हणमंत मनोहर क्षिरसागर यांनी हे देखील मान्य केले आहे की १९९० मध्ये त्याचे भाऊ खूप आजारी होते व त्यांच्या उपचारासाठी पैशाची गरज होती, परंतु पैशाच्या गरजेपोटी जमीन साधु क्षिरसागर यांना कायम स्वरुपी विक्री केली हे नाकारले. त्या दस्ताच्या वेळी त्याचे वय १६ वर्षे होते, त्या दस्तावर त्याची स्वाक्षरी नाही. गैरअर्जदार प्रेमा साधू क्षिरसागर यांनी त्यांच्या पतीच्या हक्कात करुन दिलेला व्यवहार हा कायमखुश खरेदीचा होता व त्यामध्ये कोणताही सावकारी व्यवहार नव्हता असे स्पष्ट शपथेवर सांगितले व त्यांना त्रास देण्याच्या उद्देशाने तक्रारदार यांनी आक्षेप घेतल्याचा उल्लेख केला.

**१२.** वरील सर्व बाबींचा विचार करुन भूसंपादन अधिकारी यांनी दिनांक २०.०४.२०२१ रोजी घोषीत केलेल्या निवाडयामध्ये गैरअर्जदार यांचे नावे जमीन

गट क्रमांक ४२०/१ पैकी १००० चौरस मीटर इतके क्षेत्र संपादित झलेले असल्यामुळे रक्कम रुपये ३१,५७,५००/– एवढा मावेजा मंजुर झालेला असल्याने तो मावेजा गैरअर्जदार प्रेमा साधू क्षिरसागर यांना देण्याचे आदेश देणे हे न्यायाचे व संयुक्तीक ठरेल. म्हणुन मुद्दा क्रमांक १ चे निष्कर्ष नकारार्थी देऊन मुद्दा क्रमांक २ करीता खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आ दे श

| | |
|---|---|
| १. | आक्षेप अर्जदाराचा आक्षेप नामंजूर करण्यात येतो. |
| २. | भूसंपादन अधिकारी यांनी दिनांक २०.४.२०२१ रोजी घोषीत केलेल्या निवाडयाप्रमाणे गैरअर्जदार यांच्या नावे जमीन गट क्रमांक ४२०/१, मौजे सिंदफळ, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद पैकी १००० चौरस मीटर इतके क्षेत्र संपादीत झालेले असल्यामुळे रक्कम रुपये ३१,५७,५००/– (अक्षरी रुपये एकतीस लाख सत्तावन हजार पाचशे फक्त ) व्याजासह, जर असेल तर, एवढा मावेजा गैरअर्जदार प्रेमा सारधू क्षिरसागर यांना अदा करण्यात यावा. |
| ३. | एकुण रुपये ४७,३६,२५०/– (अक्षरी रुपये सत्तेचाळीस लाख छत्तीस हजार दोनशे पन्नास फक्त ) पैकी उर्वरित रक्कम रुपये १५,७८,७५०/– (अक्षरी रुपये पंधरा लाख अष्टयाहत्तर हजार सातशे पन्नास फक्त ) जे की तक्रारदार हणमंत मनोहर क्षिरसागर व बंडू मनोहर क्षिरसागर यांच्या नावे असलेले ५०० चौरस मीटर जमीन गट क्रमांक ४२० च्या संपादनाबाबत वरील निवाडयाप्रमाणे देण्यात आलेली आहे, ते तक्रारदार हणमंत मनोहर क्षिरसागर व बंडू मनोहर क्षिरसागर यांना देण्यात यावी. |
| ४. | येणेप्रमाणे दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक १५८/२०२४ निकाली काढण्यात येतो. |

| | |
|---|---|
| ५. | खर्चाबाबत कोणताही आदेश नाही. |

Digitally signed by KHWAJA FAROOQ AHMED KHWAJA MANZURUDDIN
Date: 2026.08.10 17:41:16 +0530

दिनांक १०.०८.२०२६ (डॉ.एफ.ए.एम.ख्वाजा ),

जिल्हा न्यायाधीश-१, उस्मानाबाद.

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | -- | S.B.Ghodke(Gr-I) |
| Court | -- | District Court-1, Osmanabad. |
| Date | -- | 10.08.2026 |
| Order signed by the Presiding Officer on | -- | 10.08.2026 |
| Order re-uploaded on | -- | 10.08.2026 |